# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २१/०८/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

### पो.स्टे. काटोल हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड

### —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २०/०८/२०२४ रोजी पोस्टे काटोल येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन काटोल हद्दीतील घोडे प्लॉट काटोल मधील रूईया हायस्कुलच्या मागे गल्लीमध्ये सार्वजनिक ठिकाणी काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे काटोल येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी घोडे प्लॉट काटोल मधील रूईया हायस्कुलच्या मागे गल्लीमध्ये सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— गुणवंता पांडुरंगजी हजारे वय ५९ वर्ष, रा. आयु. डी. पि. काटोल ता. काटोल जि. नागपुर २) घनशाम नथ्थुजी सोनबरसे वय ४४ वर्ष, रा. मुर्ती ता. काटोल जि. नागपुर ३) सुखदेव जाबराव चौधरी, वय ५० वर्ष, रा. घोडे लेआउट काटोल जि. नागपुर ४) किशोर रामरावजी बैगने वय ३९ वर्ष, रा. बोरी ता. काटोल जि. नागपुर ५) रवि श्रीरामजी फरकाडे वय वर्ष रा. फैलपुरा काटोल ता. काटोल जि. नागपुर ६) रेनिश बावनजी बुटानी, वय ४१ वर्ष रा. आयु डीपी काटोल ता. काटोल जि. नागपुर** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०६ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन ५२ तासपत्ते व नगदी १६८००/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे काटोल येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील ठाणेदार पोनि. निशांत मेश्राम, पोउपनि कृष्णा गोंगले, सफौ धनराज भुक्ते, पोअं. राणा यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर